।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

ज्ञानामृतं भोजनम्।

# पाझर अमृताचा

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

❖ वर्ष १० वे ❖ अंक १ ला ❖ चैत्र -वैशाख शके १९३५ ❖ ११ एप्रिल २०१३ ते ८ जून २०१३

**प्रकाशक व मुद्रक:**
**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५
Website - www.shridatt.org

**प्रकाशनस्थळ :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**
**सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**
**सौ. शामला आपटे**

## अंतरंग


- भक्तगाथा ०३
- गोजिरवाणी ०५
  - सौ. नीता कुलकर्णी
- तरुणाई ०६
  - रघुनंदन
- उत्सव विशेष ०७
- भागिरथीच्या काठावर... ०८
- जगावेगळी १०
  - सौ. माधवी
- रुचि रुचि भोजन १०
- अवघे धरू सुपंथ - सुनयना ११
- अहो ऐकलतं का ? १४
  - मुक्ता
- गुंजारव १५
  - श्रीसस माधुरीनाथ

# संपादकीय... ✍

नवीन वर्षाच्या सर्व गुरुभक्तांना हार्दिक शुभेच्छा! नवीन वर्ष सर्व गुरुभक्तांना ज्ञान समृद्धीचे व भरभराटीचे जावो हीच गुरुचरणी प्रार्थना!

साधकांच्या ज्ञानाची वाढ माऊली करीतच असते. याचेच प्रत्यंतर मंदिरात होणाऱ्या शिबिरांच्या मालिकेवरून होत असते. याचे वर्णन 'अवघे धरू सुपंथ'मध्ये आलेच आहे. नुकताच झालेल्या महाशिवरात्री उत्सवाचे स्वरूपही असेच होते. ह्याचे वर्णन 'अहो ऐकलंत का?' मध्ये आलेले आहे. माऊलीचा आपल्या बाळांना भवसागरातून पार करण्याचा कळवळाच येथे अनुभवाला येतो.

शहरांमधून असलेले प्रत्येकाचे व्यस्त वेळापत्रक गृहीत धरूनच माऊलीने ही नवीन पद्धत अंमलात आणली आहे. ह्याचे स्वरूपही इतर उत्सवांपेक्षा थोडेसे निराळे आहे. वेगवेगळ्या स्वरूपामध्ये वेदांत शिकविला जातो. जसे पोथी, कथा, चर्चा, नाटके इ.! कमी अवधीमध्ये सतत या विषयाचा साधकाकडून अभ्यास करवून घेण्यात येतो. याचा प्रतिसादही साधकांकडून येतो हे 'तरुणाई' वाचताना लक्षात येईल.

निरंजन देव कसा पुजावा ह्याचे वर्णन 'सदाचार' वाचताना येईल. तसेच खरा अग्निहोत्री कसा हेही 'सदाचार' मध्ये समजेल. महाराज हेच खरे अग्निहोत्री आहेत याचा प्रत्यंतर आपल्याला येतच असतो. परंतु ते साधकांकडूनही अग्निहोत्र करवून घेत असतात. कारण त्यांची पूजा सर्वात्मभावे केलेली असते.

म्हणून महाराजांच्या सान्निध्यात प्रत्येकाने अग्निहोत्र साधले पाहिजे! मगच ही देहरूपी गुढी तेजाने चमकू लागेल!

श्रीसस दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिराच्या माजी अध्यक्षा व विश्वस्त गुरुभक्त परायण श्रीमती प्रमिलाबाई (माई) बल्लाळ या दि. २४ मार्च २०१३ रोजी ब्रह्मीलीन झाल्या. मंदिराच्या स्थापनेत तर त्यांचा सिंहाचा वाटा होताच, परंतु मंदिरातील अनेक उत्सवांमधून त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. फणसासारखे व्यक्तीमत्त्व लाभलेल्या माईंनी सर्व गुरुभक्तांवर मनापासून प्रेम केले व सर्वांना योग्य शिस्त व वळणही लावले. पारमार्थिक अभ्यासात जराही कुचराई न करता शांतपणे मंदिराची कामे सुसुत्रतेने कशी करावीत याचे माई हे उदाहरणच होय! सासू ही उपाधी बाजूला करून सामान्य

**पान नं. ९ वर**

आपली जमीन व मळा आपल्या ताब्यात मिळाला, त्यावर कोणाचाही बोजा राहिला नाही व कोणाचे यत्किंचितही देणे राहिले नाही असे पाहून बोवांच्या चित्तास स्थिरता आली व आता गुरुदर्शनास जाण्यास काहीच हरकत नाही असा विचार करून ते इंदुरास श्रीलक्ष्मणमहाराजांकडे गेले. शिष्य येताच श्रीगुरुस व श्रीगुरुस पाहताच शिष्यास अतिशय आनंद झाला. श्रीगुरुचरणी साष्टांग दंडवत् केल्यानंतर कुशलप्रश्न झाले. बोवांनी आपल्या घरची सर्व हकीकत गुरुमहाराजांस निवेदन केली. ती ऐकून महाराजास फारच आनंद झाला. शिष्याची पाठ थोपटून श्रीलक्ष्मणमहाराज म्हणाले, 'बोवा श्रीगुरुचरणी विश्वास असल्यास सर्व काही ठीक होते.' श्रीगुरुंचे हे वचन बोवांनी हृदयी ठेविले व आपला सर्व काल गुरुसेवेत घालवू लागले. गुरुगृही काही दिवस मुक्काम करून नंतर श्रीगुरुंची अनुज्ञा घेऊन बोवा धार येथे पुनश्च रघुनाथ पुऱ्यांतील दत्तमंदिरात उतरले. श्री. काशीनाथपंत लेले यास बोवा आल्याची बातमी कळताच ते आपल्या मंडळीसह बोवांचे दर्शनास दत्तमंदिरात आले. सर्वांस अत्यंत आनंद झाला. काशीनाथपंतांनी बोवांस नम्रपणे विनंति केली की, 'या पाळीला आपण गावात भिक्षा मागू नये. आमचे घरीच राहण्यास यावे.' बोवांनी ही गोष्ट नाकारून पुन्हा पूर्वीप्रमाणे, गावातून भिक्षा मागून आणावी, रात्रंदिवस भगवद्भजन करावे, दर गुरुवारी व दर एकादशीस हरिकथा करावी व दुपारी भागवत, योगवसिष्ठ वगैरे पुराणे सांगावीत, याप्रमाणे क्रम सुरू केला. पूर्ण सद्गुरुकृपा झाल्यामुळे बोवांच्या पुराणात, कथेत, भजनात नव्हे सहज बोलण्यातही विलक्षण प्रेम उत्पन्न होत असे. कधी कधी भगवत्प्रेमातिरेकाने त्यांच्या नेत्रावाटे टपटप आनंदाश्रु निघत. कीर्तनात नेहमी भगवन्नामच्छंदाने ते नाचत असत. तेथील सर्व श्रोतेमंडळींची बोवांच्या साधुत्वाबद्दल खात्री झाली होती. फावल्यावेळी पुष्कळ लोक बोवांकडे शंका कुशंका विचारण्यास येत. कोणी कुचेष्टेने विचारीत, कोणी सुबुद्धीने विचारीत, पण सर्वांस शांतपणे बोवा यथामति समजाऊन सांगण्याचा प्रयत्न करीत. आणखी बरीच मंडळी त्यांची अनुगृहीत झाली. मधून मधून काशीनाथपंत लेले यांच्या घरी ते पूर्वीप्रमाणे जात असत. तेथे गणपतराव तांबे वगैरे मंडळी बराच वेळ बोवांशी पारमार्थिक चर्चा करीत असत.

याप्रमाणे काही दिवस गेल्यावर धार व देवास येथील शाळेतील मुलांचा क्रिकेटचा

सामना देवास येथे होण्याचे ठरून धारच्या शाळेतील मुलांस देवास येथे नेण्याचे कामी गणपतराव तांबे यांची नेमणूक काशीनाथपंत लेले शाळासुपरिंटेंडेंट यांनी केली. त्यांचे बरोबर बोवाही देवाशास आले. त्यावेळी देवाशास श्रीशीलनाथमहाराज देवास येथील देवीच्या टेकडीच्या पायथ्याजवळ धुनी लावून बसले होते. श्रीशीलनाथमहाराज हे महान योगी होते. देवास येथील छोटेपातीचे महाराज श्रीमल्हारराव पवार हे त्यांचे शिष्य होते. श्रीशीलनाथमहाराजांची एक सुंदर छत्री त्यांनीच बांधली होती. महाराज ज्या ठिकाणी धुनी लावून बसले होते त्या ठिकाणी त्यांचे दर्शन घेण्यास दूरदूरचे लोक येत असत. बोवांच्या मनातही फार दिवसांपासून त्याचे दर्शन घेण्याची इच्छा होती. परंतु योग आला नाही. देवीच्या टेकडीच्या पायथ्याजवळ बोवा एके दिवशी सकाळी स्नान वगैरे उरकून श्रीशीलनाथमहाराजांच्या दर्शनास गेले. जाताना बरोबर एक नारळ व एक पुष्पमाला घेतली. महाराज धुनी पेटवून तिच्या संन्निध बसले होते. सर्व अंगांस विभूति लावलेली होती, जटा पिंगट असून तोंडावर विलक्षण तेज चमकत होते. महाराजांच्या समीप जाऊन त्यास बोवांनी साष्टांग नमस्कार केला. महाराजांनी प्रेमाने बोवांस उठविले व सांगितले की, ‘अंगार जैसी है वैसा रहे तो कभी कुछ भी डर नहीं’ याचा भावार्थ असा की, ‘मनुष्याने अग्नीप्रमाणे (अंतर्बाह्य पवित्र) राहिल्यास त्यास कोठेही कशाचीही भीति वाटणार नाही.’ असे वचन बोलून त्यांनी बोवांच्या कपाळास धुनीतील विभूति लावली व बोवांस आशीर्वाद दिला. महाराजांच्या चरणीं नारळ ठेवून बोवांनी बरोबर आणलेली पुष्पमाला त्यांच्या कंठी घालून पुनरपि त्यास साष्टांग नमस्कार केला. त्याच वेळी श्रीशीलनाथमहाराजांचे बंधु श्रीरामनाथमहाराज यांचीही गाठ झाली. दोघांचे भाषण वेदांतविषयावर होऊन बोधांतील अनुभवाच्या खुणा एकमेकांस ज्यावेळेस पटल्या तेव्हा दोघेही एकमेकांस अतिप्रेमाने भेटले. बोवा या ठिकाणी दर्शनास दररोज सकाळी अथवा संध्याकाळी येऊन आनंदाची लूट करीत असत. श्रीशीलनाथमहाराज व श्रीरामनाथमहाराज यांस बोवांची एकंदर भगवन्मय स्थिति पाहून आनंद वाटे व तेही बोवांशी मोकळ्या मनाने बोलत असत. काही दिवस तेथे मुक्काम केल्यावर मग गणपतराव व बोवा श्रीशीलनाथांचा आशीर्वाद घेऊन धार येथे परत गेले.

# गोजिरवाणी... ✍

**- सौ. नीता कुलकर्णी**

**आजी -** मुलांनो, नुकतीच शिवजयंती झाली. रामनवमी हा समर्थ रामदासांचा जन्मदिवस आहे. समर्थ रामदास व शिवाजी महाराज या गुरु-शिष्यांची जोडी अजरामर आहेच!

**मुले -** हो आजी!

**आजी -** म्हणूनच मी आज तुम्हाला त्यांची एक गोष्ट सांगणार आहे. एकदा रामदास स्वामी आपल्या काही शिष्यांबरोबर एका गावी आले होते. तेथे जवळच ऊसाचे शेत होते. शिष्यमंडळींनी त्या शेतातील ऊस कुणालाही न विचारता खाल्ले.

**मुले -** बाप रे! मग?

**आजी -** मग काय ही गोष्ट शेतमालकाला कळताच तो तावातावाने आला. त्याला वाटले की रामदास स्वामींनीच आपले नुकसान केले. म्हणून त्याने एक ऊस घेऊन रामदास स्वामींच्या पाठीवर मारले. त्यांच्या पाठीवर त्याचे वळही उठले.

**मुले -** मग ते रागावले का?

**आजी -** अरे, ते संतच होते ना! ते काहीच बोलले नाहीत. पण शिवाजी महाराज मात्र त्यावेळी त्या गावात आले होते. त्यांच्या कानावर ही गोष्ट पडताच ते ताबडतोब रामदास स्वामींकडे गेले व 'त्या शेतकऱ्याला काय शिक्षा करू?' असे विचारले. समर्थांनी मात्र सांगितले, ''माझ्या शिष्यांनीच गुन्हा केला आहे. त्याचे प्रायश्चित्त मी भोगलेच पाहिजे.''

**मुले -** खरचं, किती प्रामाणिक होते रामदास स्वामी!

**आजी -** अरे, इकडे शेत मालकास बोलावणे गेले. तो खूपच घाबरला व शिवाजी महाराजांचे व समर्थांचे पाय धरू लागला. समर्थ त्यास म्हणाले,''तू घाबरू नकोस! तुझे काहीच चुकले नाही.'' नंतर त्यांनी शिवाजी महाराजांना त्या शेतकऱ्याला तो गाव इनाम द्यावा असे सुचविले.

**मुले -** हो?

**आजी -** सांगा बरे तुम्हाला काय भावले?

**मुले -** समर्थांचा प्रामाणिकपणा!

**पान नं. ९ वर**

# तरुणाई... ✍

- रघुनंदन

## रायगडाला जेंव्हा जाग येते...

'हर हर महादेव' च्या आरोळ्या व 'शिवाजी महाराज कीऽऽ जय' या शब्दांनी मराठी मन अभिमानाने ओले चिंब होते व हात कंबरेला असलेल्या काल्पनिक म्यानेत तलवार उपसण्यासाठी जातात. शिवाजी महाराज म्हणजे साक्षात् शिवाचा अवतार! या अवताराने मराठी मातीला मोगलांच्या व दख्खनशाहीच्या असुरांपासून ओरबाडून घेऊन त्याचे इंद्रप्रस्थ केले. शिवाजी महाराज कोण होते हे शब्दात मांडणे कठिण, पण विचार केला तर त्यांची श्रीविष्णुच्या दशावतारासारखी अनेक रूपे डोळ्यांसमोर उभी ठाकतात!

कोण होते छत्रपती? कोण होते आपले महाराज? वयाच्या सोळाव्या वर्षी साक्षात् भवानी मातेस व शिवशंभोस साक्षी ठेवून तोरणा किल्ला जिंकणारे? प्रतापगडावरच्या शामीयान्यात अफजलखानासारख्या दैत्याचे पोट ओरबाडून काढणारे? औरंगजेबाच्या मामाची म्हणजेच शाहीस्तेखानाची बोटे तलवारीने छाटणारे? आग्र्याच्या दरबारात औरंगजेबाकडे पाठ फिरवून सदरेवरून तडकाफडकी बाहेर पडणारे? आपल्या मातेची जीवापाड सेवा करणारे? समर्थांनी दिलेले बैरागी कोदंड धारण करून राज्य सिंहासनावर विराजीत होणारे? की समर्थांच्या पायाशी वैरागी होण्याची इच्छा दर्शविणारे? प्रश्न अनेक, पण उत्तर एकच ''गोब्राह्मणप्रतिपालक क्षत्रियकुलावतंस छत्रपति शिवाजी महाराज''!

शिवाजी महाराज म्हणजे प्रत्यक्ष हिमालयालाही लाजवील असा कर्तबगारीचा महामेरू पर्वत! महामेरू पर्वतास जसा भगवान श्रीविष्णुने कुर्मरूपात आधार दिला, तसेच महाराजांच्या कर्तबगारीला दोन भक्कम आधार मिळाले. एक म्हणजे जिजाऊसाहेब म्हणजेच मांसाहेब व दुसरा म्हणजे समर्थ रामदास! या दोन आधारांच्या सहाय्याने महाराजांनी 'श्रीं'चे राज्य प्रस्थापित केले व या मराठी मातीवर सर्वत्र भगवा फडकवून तिला पावन केले. या राज्य प्रस्थापनेच्या कार्यात अनेक जीव कामी आले व आपल्या रक्ताने त्यांनी मराठी माती पावन केली. बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी देशपांडे, तानाजी मालुसरे नावे घेऊ तेवढी थोडी! अशा या श्रीमंत योग्याच्या स्मरणार्थ हा लेख!

आता आपण आपल्या देहाला एक गड समजुया व या गडावर भगवा फडकावून 'श्रीं'चे राज्य प्रस्थापित करावयास आपल्या आतील शिवाजीस जागे करू या! जसे शिवाजी महाराजांना जिजाऊ व समर्थ उपदेश करीत होते, तसेच गुरूदेव आपल्याला सांगत असतात. ज्याप्रमाणे महाराजांना विशालगडावर सुखरूप पोहोचवायला बाजीप्रभू

देशपांडेनी शत्रुला खिंडीत रोखून ठेवले, त्याप्रमाणे आपल्या आतल्या महाराजांचे सुख घेण्यासाठी विकारांना देहाच्या खिंडीतून हद्दपार केले पाहिजे. ज्याप्रमाणे तानाजीने स्वतःच्या प्राणाची बाजी लावून उदयभानाला ढेर केले त्याचप्रमाणे आपण स्वतःची पर्वा न करता आपल्या विकारांना ढेर केले पाहिजे. गुरुदेवांच्या सहाय्याने आपण आपल्या देहावर सर्वत्र 'श्रीं' चे राज्य प्रस्थापित करू शकतो. जसे महाराजांनी समर्थांच्या झोळीत आपले राज्य काही विचार न करता टाकले तसे आपल्या देहाचे राज्य गुरुदेवांच्या झोळीत टाकून ते 'श्रीं'चे मानून त्यावर एका तिऱ्हाईताप्रमाणे रामराज्य केले पाहिजे. महाराजांना जशी मावळ्यांची साथ मिळाली, तशीच आपल्या सद्‌गुणांची साथ आपल्याला मिळते. 'हर हर महादेव'चा युद्धघोष म्हणजे हर हर (प्रत्येक) योद्धा 'महादेव' आहे या आवेशात देहाची प्रत्येक मोहीम फत्ते केली पाहिजे.

समर्थांनी म्हटलेच आहे...

**शिवरायाचे आठवावे रूप! शिवरायाचा आठवावा प्रताप!!!**

---

# उत्सव विशेष...

## महाशिवरात्री उत्सव २०१३

**माघ कृ. ११ ते माघ कृ. १४ शके १९३४ दि. ८ मार्च ते १० मार्च २०१३**

### मूळपद

द्रष्टा दृश्य आपण होऊनी। सत्ता शिवसाचा।।१।। शिवशक्तीचा विलास विश्व। खेळ स्वानंदाचा।।धृ.।
अनंत शक्ति सहज स्फूर्ति। द्वैतभाव कैचा।।२।। ब्रह्मानंदे स्वरूपछंदे। दत्तभजनी नाचा।।३।।

## श्रीसस भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव २०१३

**फाल्गुन शु. ११ ते फाल्गुन कृ. ६ शके १९३४ दि. २३ मार्च ते १ एप्रिल २०१३**

### मूळपद

गुरुरायाचे पदक्षेत्रवासी वो। सर्व भावे होईन त्यांची दासी वो।।१।।
मज करणे काहीच नाही उरले। गुरुभक्तांचे वंदीन पाऊले।।२।।
गुरुभक्त नांदती जया देशी वो। तो मी देश ध्यायीन अहर्निशी वो।।३।।
गुरुभक्तीचा कुळधर्म ज्या घरी। त्याच्या मूर्ती मी पूजीन अंतरी।।४।।
गुरुदासाच्या आश्रमी राहीन। सर्व सुखाचे निजफळ लाहीन।।५।।
गुरूवेगळे दैवत ज्यासी नाही वो। म्हणे केशव शरण त्याच्या पायी वो।।६।।

## भागिरथीच्या काठावर बसले असताना अंगावर उडालेले ज्ञानतुषार... ✍

### सदाचार

११) निजतृप्तिसुखेंकडून। स्वइंद्रियां करी तर्पण।
मने मना प्रबोधून। स्वयें आत्मा प्रकाशे।।११।।

**अर्थ -** निज तृप्ती सुखाने स्वतःच्या इंद्रियांना संतुष्ट करून मनानेच मनाला प्रबोधून 'मी' आत्मा प्रकाशतो.

**भावार्थ -** विषयोपभोगाने इंद्रिये क्षणिकच संतुष्ट झाल्यासारखी वाटतात. त्यांची हाव वाढतच राहते. पण निजतृप्तीच्या सुखाने म्हणजेच जेथे द्वैताचेही भान नसते अशा सुखात इंद्रिये पूर्ण संतुष्ट होतात, ती पूर्णपणे शांत होतात. जसे भूक लागलेली असताना व्यवस्थित आहार घेतला तर भूक शांत होते व अन्न अंगी लागते. परंतु जर त्यावेळी नीट आहार घेतला नाही तर भूकेचे शमन होत नाही व वखवख वाढते. तसेच निजाच्या तृप्तीने जे सुख लाभते त्यामुळे इंद्रिय शमन किंवा दमन होत नाही तर ती पूर्णपणे शांत होतात. त्यांना वेगळे बाजूला काढावे न लागता त्यांची स्वरूपाशी मिळणी होते. स्वरूपाशी तादात्म्य पावलेले मन, देहबुद्धी घेणाऱ्या मनाचे प्रबोधन करते. म्हणजेच आपल्याच आत उठलेल्या दोन वृत्ती - एक स्वरूपातून उठलेली व दुसरी देहाकडे झुकणारी! स्वरूपातून उठलेली वृत्ती दुसऱ्या वृत्तीहून समर्थ ठरते आणि तेव्हाच 'मी' आत्मा प्रकाशतो. 'मी'चा प्रकाश दिसू लागतो म्हणजेच आचार, विचार व उच्चार ह्यांचे वळण बदललेले दिसते.

१२) आत्मा स्वप्रकाशअग्नीत। एकाहूती अर्पी चित्त।
तो अग्निहोत्री जाणिजेत। येर हे नामधारी।।१२।।

**अर्थ -** आत्मा हा स्वप्रकाशित असतो. त्या अग्नित चित्त हे एका आहुतीने अर्पण केले तरच तो अग्निहोत्री जाणावा. बाकीचे सारे फक्त नामधारण करणारे आहेत.

**भावार्थ -** आत्मा प्रकाशल्यानंतरचा भाग येथे वर्णन केला आहे. चित्त हेच नामरूप कल्पित असते व विकाररूप असते. ज्ञानाग्नी धडाडल्यावर आत्मा प्रकाशतो व त्या

अग्नीत चित्ताची एक आहुती देऊन ते अर्पण केले म्हणजेच त्याचे स्वतंत्र अस्तित्व न उरता ते चिद्रूप झाले. अग्नीत टाकलेली वस्तू नाश होऊन जाते, तसेच चित्ताची एकाहुती देऊन ते अर्पिले म्हणजेच त्याचे वेगळेपण उरत नाही. अशाप्रकारे जो चित्तार्पण करतो तोच खरा अग्निहोत्री होय. सद्गुरुंच्या ठिकाणी असे अग्निहोत्र सतत चालू असते. बाकीचे सारे फक्त अग्निहोत्री नामधारण करणारे असतात.

१३) देह देवालय बोलिजे। निरंजन देव ओळखिजे।

स्वानुभवें अर्चिता विराजे। सर्वात्मभावे।।१३।।

**अर्थ -** देहालाच देऊळ म्हणावे व निरंजन देव ओळखावा. स्वानुभुतिने व सर्वात्मभावे केलेली पूजा हीच श्रेष्ठ ठरते.

**भावार्थ -** येथे पूजनाचा विधी सांगितला आहे. देह हेच देवालय आहे हे जाणायला हवे. बाहेरील देवळामध्ये जशी गाभाऱ्यात देवाची मूर्ती असते तसेच देह देवालयात निरंजन देव ओळखला पाहिजे. या आतल्या देवापासून 'मी' हा आवाज येतो, हे जाणल्यावर होणारी प्रत्येक क्रिया ही देवाची पूजाच होते. बाहेरील देवळात जाऊन पूजा करण्याची गरज राहत नाही. हा निरंजन देव जाणायला लागल्यावर येणारी

**पान नं. १३ वर**

---

**पान नं. ५ वरून**

**आजी -** खरेच! रामदास स्वामी मोठ्या मनाचे होते. त्यांना आपल्याला बसलेल्या मारापेक्षाही शेतकऱ्याला न्याय मिळावा असे वाटले. तसेच शिवाजी महाराज त्यांचे शिष्य होते व राजा होते. त्यामुळे राजाच्या हातून अन्याय न होण्याची खबरदारीही त्यांनी घेतली. एवढेच नाही तर त्या शेतकऱ्याला शिवाजी महाराजांकडून इनाम द्यायला लावले.

---

**पान नं. २ वरून**

साधकाप्रमाणेच माऊलीकडून ज्ञानाचे धडे त्या गिरवीत असत. अशी ही 'सासू सुनेची' अपूर्व जोडी! समाज सुधारणेचा डंका पिटवूनही कधी कधी काहीच साध्य होत नाही. अशा पार्श्वभूमीवर न बोलता अनेक आदर्शांचा पायाच माईंनी घालून दिला आहे. सर्व गुरुभक्तांकडून माईंच्या स्मृतीस सप्रेम सादर प्रणाम!

## जगावेगळी... ✍ - सौ. माधवी

'माईंनी देह ठेवला' हे ऐकले नी मन भूतकाळात शिरले. गुरुदेवांचे गुरुपद नुकतेच सुरु झाले होते. डोंबिवलीला त्या बोध देत असत. काहीशा करारी व कडक वाटणाऱ्या त्यांच्या सासूबाई माई! नंतर असेही समजले की गुरुदेवांना श्रीसस दत्तात्रेय महाराजांकडून बोध माईंनीच घ्यायला लावला.

गुरुदेव बोरिवलीला रहायला आले व काही दिवसातच श्रीसस दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिराची गोराईला स्थापना झाली. माई संस्थेच्या विश्वस्त व अध्यक्षा झाल्या. मंदिराच्या स्थापनेच्या निमित्ताने तेथील आजुबाजूच्या रहिवाशांना दोन दिवस महाप्रसाद दिला होता. स्वतः माईंनी १००-१५० लोकांचा स्वयंपाक केला होता. साक्षात् अन्नपूर्णाच त्या! त्यांच्या हातचे जेवण जेवणारा बोटे चाटत राही. अनेक वर्षे प्रत्येक गुरुपौर्णिमेला १५०-२०० लोकांचा महाप्रसादाचा स्वयंपाक त्या स्वतः करीत. तसेच अनेक उत्सवांमधूनही त्या कार्यरत असत. मंदिरात पूर्णपणे राहून मंदिराला स्वच्छतेची व कामाची शिस्त त्यांनीच लावली.

कौतुकाची बाब म्हणजे सामान्य साधकाप्रमाणे त्या श्रवण करीत असत. गुरुदेवांकडून ज्ञान घेत असत. सासूच्या उपाधीची त्यांना कधीच अडचण होत नसे. ती बाजूला ठेवून शिष्यभावाने त्या सहज सहभागी होत. गुरुदेवांच्या अनुपस्थितीत सर्व साधकांना प्रापंचिक गप्पा मारू न देता त्यांच्याकडून साधन अभ्यास करवून घेत!

'सासू-सून' या नात्याची सर्वत्र चर्चा होत असते. 'सुनेला स्वातंत्र्य द्या'चा पुकारा केला जातो. अशा वेळी माईंसारखी सासू डोळ्यासमोर उभी राहते. सुनेला तिच्या कार्यात नुसतेच सहकार्य न देता त्यात स्वतःस झोकून देणारी! सून ही उपाधी बाजूला सारून सद्गुरु पहाणारी! सर्व गुरुभक्तांवर अबोल प्रेम करणारी! अशा या जगावेगळ्या माईंच्या स्मृतीस सप्रेम सादर प्रणाम!!!

---

# रूचि रूचि भोजन

सोनियाचे ताट वाढिले केशरी साखरभात। गवल्याची खीर वाढिली दूध साखर त्यांत।।१।।
गरे बर्फीच्या आणि पाकवड्या ठेवी आत। वाटी भरूनिया पन्हें वाढिलें साखर मिश्रित।।२।।
म्हणे माता यदुविरा सुंदरा जेवी आता। सनकादिक मुनीजन प्रार्थिती जोडुनियां हाता।।३।।
रुक्मिणीने लाडू वाढिले घ्या विश्वनाथा। भामेचा तो सुंदर मांडा जेवी बा अनंता।।४।।
पादुकाला धरूनी राहिली जांबुवंत सुता। गंगाजळाची झारी भरूनिया उभी जगन्माता।।५।।

# अवघे धरू सुपंथ...

**- सुनयना**

तीन दिवसांचे निवासी शिबिर मंदिरात होणार ही कुणकुण लागली होती. पण असे समजले होते की हा नेहमीसारखा साधा उत्सव नसून यामध्ये सगळ्यांना प्रवेश नाही. ठराविक लोकांना बोलावले गेलेले आहे. मग हळूहळू समजले ह्या शिबिरात उन्हाळी शिबिरातील निवडक मुले व त्यांचे पालक सहभागी होणार आहेत. सर्वांना प्रवेश नाही हे समजल्यावर एरवी मंदिरात उत्सवांना जाण्यास फारसे उत्सुक नसलेलो आम्ही शिबिराच्या बोलावण्याची आतुरतेने वाट पहात होतो. मंदिरात बोलावणे न आल्यानेच एरवीच्या बोलवण्याची किंमत मात्र समजली.

होता होता एक दिवस गु. भ. लताताईंनी मंदिरातील शिबिराची कल्पना दिली व निमंत्रण मात्र वेगळेच दिले. ती म्हणाली, ''तू येऊच नको या उत्सवाला! कारण एक दिवस येऊन वा ये-जा करून हा उत्सव साधता येणार नाही. तुला काही तीन दिवस पूर्णपणे राहता येणार नाही. तेव्हा तू असे कर या उत्सवादरम्यान मंदिरात येऊ नकोस!'' झाले, अशा बोलावण्याचा योग्य तोच परिणाम झाला. प्रकर्षाने मंदिरात जाण्याची गरज वाटू लागली. येऊ नको म्हटले ना, मग जायचेच असे ठरले! 'घी सीधी ऊँगलीसे ना निकले तो ऊँगली टेढी करनी पडती है।' हे महाराज जाणूनच असतात. म्हणून तर कधी कधी गुगली टाकून आपली विकेटच घेतात.

९ ऑक्टोंबर ते ११ ऑक्टोंबर २०१२ असा या शिबिराचा कालावधी होता. महाराज खरचं प्रयोगशील असतात. शास्त्रज्ञ हा निरनिराळे प्रयोग करून एखाद्या विषयाचे रहस्य उलगडत असतो तर महाराज उलगडलेले रहस्यच आमच्या हृदयात साठवण्यासाठी निरनिराळे प्रयोग करीत असतात.

पहिल्याच दिवशी विविध प्रश्नांद्वारे सर्व साधकांना महाराजांनी मंदिरात अभ्यास करण्याचे प्रयोजन विचारले. न्यूनगंडातून उत्तरे आलेल्यांना तो दूर करायला लावून तर अहंकाराने उत्तरे देणाऱ्यांना त्यांची जागा दाखवत सर्वांना एका पातळीवर ठेवण्याचे कौशल्यही त्यांचेच! **नेतृत्व गुणावर प्रकाश टाकून तोच विकसित करण्यासाठीच हे शिबिर होते** हे मागाहून समजले. त्यासाठी अंत:करण कृपा, ईशकृपा व गुरुकृपा ह्यांची जोड हवीच हे सांगण्यात आले. गुरुकार्य व परंपरा पुढे नेण्यास एखादा उत्तम अधिकारी समर्थ असतो. पण अशा उत्तमाच्या अंगीही नेतृत्व

करण्याची क्षमता असायला हवी. या अनुषंगानेच तीन वेळा पोथी व संध्याकाळी कथा झाल्या. मधल्या वेळेत वेगवेगळे पारमार्थिक खेळ व विषयानुरूप परिसंवाद व चर्चा झाल्या. त्याही हसतखेळत! रात्री होणारी नाटकेही अशीच असायची.

पहिल्या शिबिराचा अंमल काही ओसरत नाही तोच दुसऱ्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०१२ दरम्यान होते. शिबिराच्या पहिल्याच दिवशी महाराजांनी प्रत्येकाला स्वत:चे गुण व दोष एका वाक्यात सांगायला सांगितले. सरते शेवटी असे लक्षात आले की आपले गुण असतात तेच दोष ठरतात व दोष हेच गुण असतात. गुण दोषांमधील गुण दोष काढून टाकून महाराज आपल्याला एकत्वाकडे कसे नेत असतात हे समजतही नाही. गुण दोष पहाण्याची आपली दृष्टीच ते बदलतात. आपले स्वत:चे व्यवस्थापन आपण नीट करू शकलो नाही तर एखाद्या संस्थेचे कसे करणार? **हे शिबिर व्यवस्थापन या तत्त्वावर आधारीत होते.** उत्तम व्यवस्थापकाचे गुण अंगी बाणवताना प्रथम अंतर्गत व्यवस्थापनावर भर दिला गेला. नंतरची पायरी म्हणजे नवविधा भक्तीच्या सहाय्याने समोरील व्यक्ती, समुह व संस्थेचा विकास कसा साधायचा हे सांगितले गेले. त्यासाठी महाराजांनी व्यवहारातील अनेक सोपी उदाहरणे दिली. श्रवण म्हणजे समोरील व्यक्तीचे पूर्वग्रह सोडून ऐकणे, समोरून माहिती आल्यावर त्यावर चिंतन म्हणजे अर्चन! विचार म्हणजेच स्मरण, कीर्तन! समोरील व्यक्तीच्या मतांचा आदर म्हणजेच पादसेवन, अधिकारी व्यक्तींना मान देणे म्हणजेच वंदन व सख्य जोडणे म्हणजेच सख्यभक्ती! त्यांच्याकडून ज्ञानग्रहण म्हणजेच दास्य! सरतेशेवटी समोरील जनसमुदायाशी या नवविधाभक्तीद्वारे आपण एकरूप होतो व त्याचे गुणदोष ओळखतो म्हणजेच आत्मनिवेदन करतो. हे करीत असतानाच जे धोरणात्मक बदल केले जातात ते परिणामकारक असतात आणि त्यामुळेच व्यक्तिविकास तर होतोच पण त्याबरोबरच समूह व संस्थेचा विकासही होतो.

स्वतंत्र विचार करण्याची सवय लागतानाच इतरांचे विचारही कसे समजून घ्यायचे याचेही प्रात्यक्षिक या उत्सवात दुपारच्या फावल्या वेळात दिले गेले. महाराजांनी एक पद सर्वांना अभ्यासास दिले होते. प्रत्येक गुरुभक्ताने त्याचा आपल्याला लागलेला अर्थ इतर गुरुभक्तांना सांगायचा! व्यक्ति विकास व समूह विकासाचे ते एक प्रात्यक्षिकच होते व व्यवस्थापनाचा एक भाग होता हे मात्र नंतरच उमगले. उद्दीष्ट पूर्ण झाल्यावर त्या मार्गावर परतून एक वेगळीच मजा अनुभवावी असे नंतर वाटले.

ज्ञान पचविण्यासही थोडा कालावधी लागतोच. तेव्हा तीन महिन्यानंतर संक्रांतीचे निमित्त साधून १३ ते १५ जानेवारी २०१३ दरम्यान तिसरे शिबिर सुरू झाले. अनेक गुरुभक्तांकडून या शिबिरापूर्वी विचारणा होत होती. तसेच 'आम्हाला आता प्रवेश मिळेल का?' असेही विचारले जात होते. याच पार्श्वभूमीवर हे शिबिर सर्वांसाठी खुले होते. फक्त तीन दिवस संपूर्ण निवास एवढी एकच अट घालण्यात आली. मागील दोन्ही शिबिरातून तयार झालेले साधक व नव्याने या शिबिरात दाखल होणारे साधक उत्सुकतेने हजर झाले. नेतृत्व गुण अंगी बाणवून, व्यवस्थापन कौशल्यासहीत एखादे कार्य करणाऱ्या व्यक्तीला अडचणींचा सामना करावा लागतो, आणि मग कधी कधी तो आत्मविश्वास हरवून बसतो व निराश होतो. मग त्याचे परिणाम मात्र त्याला एकट्यालाच भोगावे न लागता त्याची झळ त्याचे साथीदार व संस्थेलाही लागते.

**प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या ध्येयाला चिकटून कसे राहायचे, किंबहुना अशी परिस्थितीच येऊ नये यासाठी कशा प्रकारचा अभ्यास करायचा हे या उत्सवात महाराजांनी सांगितले.**

देहभाव सोडून ब्रह्मभाव जोडल्यावर मीच कसा व्यापक आहे हे साधन अभ्यासाने दृढ होते. असा स्वरूपावर आरूढ असलेला साधक गुरुकार्य पुढे नेण्यास समर्थ ठरतो. अशा साधकाला सारे मार्ग सरळ, सोपे असतात.

आपण भरकटलेले असतो तेव्हा आपल्याला मार्गावर आणायला महाराज शिकवतात. म्हणजेच प्रथम आपण आपले नेतृत्व करतो. या नेतृत्वात उच्चश्रेणी मिळाल्यावर इतरांचे नेतृत्व करू शकतो. स्वतःचे व्यवस्थापन केल्यावरच इतरांचे व्यवस्थापन करायलाही महाराजांनी शिकविले. सर्वांबरोबर एकत्वाने कार्य करीत असताना मार्ग कसा सुलभ होतो हेही दाखवून दिले. टप्प्याटप्प्यांनी होणारी शिबिरे व्यक्तीचा स्वतंत्ररित्या तर विकास करतातच पण एकत्र कार्य करण्यासही साधकांना अनुरूप बनवितात.

**महाराजांचा हात धरु, अवघे धरू सुपंथ!**

---

**पान नं. ९ वरून**

अनुभूती व त्यानुसार होणारी क्रिया ही त्याची पूजाच ठरते. ही पूजा सर्वात्मभावे केली जाते. म्हणजेच सगळीकडे भगवंत पाहिला जातो व त्याची अर्चना आपोआप होते. अशी केलेली पूजा विराजते म्हणजेच शोभून दिसते. इतर पूजा विधीप्रमाणे यास काहीही साधने लागत नाहीत, तरीही ती श्रेष्ठच ठरते.

# अहो ऐकलतं का?... ✍

**- मुक्ता**

## खिलाडी हो तो ऐसा हो...

'शांतीसागर' फक्त गुरुमहाराजच असतात हेच आम्हाला इतके दिवस माहित होते. खरं तर शांतीचा खरा अर्थ तरी कुठे माहित होता? वरवरची शांती काही कामाची नाही एवढे माहित होते. पण खऱ्या शांतीकडे कशी वाटचाल करावी याचे जणू बाळकडूच नुकत्याच झालेल्या महाशिवरात्री उत्सवात महाराजांनी दिले.

पहिल्या दिवशी 'शांतीसागर' पोथी घेताना मध्यस्थ विटंबना म्हणजे काय हे समजून घेताना आपणही याच भूमिकेत अडकलो आहोत असे बहुतांशी साधकांना वाटत होते. परंतु जशी पोथी पुढे सरकत होती, तसे महाराज प्रत्येकाला एकेका भूमिकेतून बाहेर काढून दुसऱ्या सखोल भूमिकेपर्यंत नेत होते. चित्त विषय अनुरागी असेल तर ब्रह्मप्राप्तीत कसा अडथळा निर्माण होतो याचे वर्णन महाराजांनी केले. तसेच या चित्तास निजस्मरणाच्या कासेला लावण्यासाठी त्याच्या हाती नामाची माळ द्यावयास हवी हेही सांगण्यात आले. महामुनी यज्ञशर्माच्या पुत्रांची गोष्ट समजून घेताना स्थूळ देहाचा प्रपंच सूक्ष्म देह करीतच असतो व तो त्यास करू द्यावा व आपण मोकळे रहावे हेच महाराज सांगत होते. आपल्याला मागण्याची सवयच असते, ती जर जात नसेल तर **'रूपी तुझ्या रमावे, मज नाथ हेचि द्यावे'** असे त्याचे वळण तरी बदलावे असे सांगितले.

हळूहळू महाराजांनी 'ब्रह्मप्राप्तिविवरण', 'ब्रह्मप्राप्तिदृढीकरण', व 'ब्रह्मप्राप्ति निरूपण' करीत करीत 'प्राप्त पुरुषोत्कृष्ट-प्रौढीवर्णन' पर्यंत कसे नेले ते समजलेच नाही. वस्तु खरी व तिचा अनुभवच खरा असतो. म्हणूनच तिचे वर्णन मात्र प्रौढी ठरते. प्रत्येकाने ह्याचा अनुभव घ्यायचा आहे.

एकीकडे महाराजांकडून 'शांतिसागर' शिकत होतो, तर गु. भ. लतातांईकडून 'विज्ञानसागरा'चे धडे मिळत होते. भक्ति-ज्ञान-वैराग्य यांचा संगम ऐकायला येत होता. भक्तिमार्ग कसा निष्कटंक आहे हे जाणायला मिळाले. भगवंताची बिरूदे (सर्वज्ञ, समदर्शी, अंतर्यामी, विश्वभंर, भक्तरक्षक इ.) वर्णन केली गेली. भगवंत आपल्या भक्तांसाठी कसा धावून जातो हे राजा अंबरिशाच्या गोष्टीत समजले. भक्ती करायला ना पैसा लागतो, ना श्रम! फक्त भाव असला तरी भक्ती कशी करता येते हेही समजले.

शांतिसागराकडे वाटचाल करताना विज्ञानसागरातील भक्ती कशी कामी येते हे जाणवले. या भक्तीनेच चित्त शांत होते व ते शुद्ध होते.

संध्याकाळी कथांमध्ये शिवशक्तीचा महिमा वर्णन केला जात होता. शिवशक्तीचा जो विलास आहे तो जाणण्यास आपण द्रष्टा, दृश्य, दर्शन ही त्रिपुटी सोडायला हवी. तरच अनंत शक्ती पहाताना द्वैतभाव येत नाही आणि मगच खऱ्या अर्थी सद्‌गुरु शंकर व बुद्धी पार्वतीचे लग्न लागते. रात्री 'जय जय गौरी शंकर' या नाटकाने बहार येत होती.

हा तीन दिवसांचा उत्सव निवासी शिबिर या स्वरूपात होता. पाचही मिनीटे माऊली साधकांना रिकामे बसू देत नव्हती. 'लगाम टूक ढिली नही छोडे, चढा रहे मन घोडे उपर' हे खरेच! आणि म्हणूनच उत्सवाच्या शेवटी '**अचलराम सवार वही पक्का, खिलाडी हो तो ऐसा हो**' हा अनुभव तर मिळालाच परंतु असे स्वार होणारे महाराज आपण आहोत हे अनुभवास आले.

■■■

## गुंजारव... ✍

**- श्रीसस माधुरीनाथ**

'**गु**' कार अज्ञान, अंधःकार, फासा गळा लागला जीवा।<br>
'**ढी**' ला करा हो, वाचवा हो, सद्‌गुरु देवाऽऽ।।धृ।।<br>
'**गु**' कारा घेऊनी गुरगुरतो जीव त्यासी समजावा।<br>
'**गु**' रूगुरु नको शांती वरी तू सद्‌गुरु भजावा।।१।।<br>
'**ढि**' ला पडु नको परमार्थामध्ये सावध करावा।<br>
'**ढि**'ल येथे काही कामाची नाही, जाणुनी वागवा।।२।।<br>
'**पा**' चाचा प्रपंच पाचातच राहू दे, एकात न घुसवावा।<br>
'**पा**' हा वा परमात्मा सगळीकडे, एकच जाणावा।।३।।<br>
'**ड**' गमगू नको लटपटू नको, फटक्याने नशिबाच्या।<br>
'**ड**' र कुणाची बाळगू नको, निर्भय रहावा।।४।।<br>
'**वा**' ण कुणाची वाटू नको, गुरुगुरु वदावा।<br>
'**वा**' णी माधुरीची दत्ता ठकू वदवी त्याते स्मरावा।।५।।<br>
ऐशा गुढीपाडव्याला 'गु'कार 'ढी'ला पाडावा।<br>
स्वानंदाची मग गुढी उभारा साजरा पाडवा।।६।।

BOOK-POST

To,

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

## संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १३
दि. १९ मे ते २६ मे २०१३

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५
दि. १४ जुलै ते २३ जुलै २०१३

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. १३ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०१३

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. १० नोव्हें. ते १९ नोव्हें २०१३

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व. १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ. १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व.१ ते ९ |